ई.पेपर पदार्पण

लेखणी शस्त्र बलशाली
police friend

# पोलीस व्हिजन

E-mail :- policevision@gmail.com

Website Domain-http://policevision.co.in/

❀ कार्यकारी संपादिका-सौ.प्रतिभा साळुंके ❀

मुख्य संपादक - प्रल्हाद साळुंके - मोबा- 9881404361

RNI.NO.MAHMAR/2010/32153

❀ धुळे ❀ वर्ष-१२वे ❀ अंक-०१ ❀ वार-मंगळवार दिनांक-२३ नोव्हेंबर२०२१ ते दि-२९ नोव्हेंबर २०२१ ❀ (डाक-गुरुवार) ❀ पाने-०४ ❀ मुल्य-०३ रु ❀

# धुळे जिल्हा माध्य.शिक्षण विभाग टाकतोय कात!

## कर्तव्य दक्ष धुळे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी मोहन देसले यांच्या काम करण्याच्या जिद्दीला शिक्षक करतात सलाम!



संपादक
प्रल्हाद साळुंके
लक्षवेधी

धुळे- धुळे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभाग काही वर्षांपूर्वी संपूर्ण महाराष्ट्रात बदनाम झालेला हा विभाग होता.विविध माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी या विभागाला आपले इनलिगल कामांतून भरमसाठ खिसे भरण्याचे स्वयंभू यंत्र समजले होते.प्रामाणिक शिक्षकांना या कार्यालयात घुसण्याची देखील भिती होती.जो प्रामाणिक शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी या कार्यालयात आपले काम घेऊन येत असे,त्याला सहज आपले काम होऊन जाईल अशी खात्री वाटत असे तेव्हा मात्र त्यास येथल्या प्रस्तक्ष परीस्थीती पाहूण मनस्ताप झाल्याशिवाय काही हाती लागत नसे! काम होता होईना अखेर त्यांना येथे जो घोडा बाजार चालत होता.ज्यांच्या मार्फत तो चालत होता.अशा काही दलालांना भेटूनच चिरी-मिरी दिल्याशिवाय गत्यंतर नव्हती.अनेक दलाल यात धट झाले.अनेक या शिक्षण विभागातील वाटा पाडून खाणारे धनदांगडे झाले.नंतर ते मात्र ॲण्टी करप्शनच्या जाळ्यात अडकूण शेजारीच असलेल्या जेलीत हवा खायला गेले.मात्र कालांतराने या विभागाची सुत्रे तत्कालीन शिक्षणाधिकारी डॉ.सुभाष बोरसे यांच्या हाती आली.मात्र त्यांना येथील बनावट शालार्थ आय.डी.,बनावट मान्यता दिलेल्या शिक्षकांचे प्रकरण निदर्शनास आले.चाणाक्ष व अभ्यासू वृत्तीचे अधिकारी म्हणून त्यांनी या कार्यालयास एक नवीन शिस्त लावण्याचा प्रयत्न केला.ताक फुंकुन काम करणे त्यांनी पसंत केले.अतिशय बरबटलेला विभाग त्यांच्या हाती दिला गेला त्यामुळे ते हताश न होता शासनाला सत्यता मांडण्यासाठी पुढाकार घेऊन त्यांची या कार्यालयातील पूर्वी चाललेला खेळाचा फर्दाफाश केला.सोन्याचे अंडे देणारे वेतन पथक देखील तेव्हा सर्वांच्या नजरत आले.शिक्षकांचे वेतन जरी वेळेवर निघत होते.त्यातून शिक्षकांचे लक्ष चांगले चालले आहे यावर असायचे मात्र तीकडे भलतेच उद्योग सूरू असायचे! याच कारणाने वेतन पथक अधिक्षीका यांच्या विषयी देखील त्यांना विविध अनियमित वेतन अदा करण्याचे लक्षात आले.त्यातून त्यांची अनेकदा शैक्षणिक संघटनांच्या प्रमुखांसमोर शाब्दीक चकमकी देखील झाल्या.या प्रकाराने धुळे जिल्ह्यातील प्रामाणिक शिक्षकांचे पगारांचे देखील हाल झालेत.तत्कालीन वेतन पथक अधिक्षिका व तत्कालीन शिक्षणाधिकारी यांच्या या भानगडी रोज धुळे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात जायला लागल्या.अनेकदा प्रभारी शिक्षणाधिकारी प्राथ.मनिष पवार यांचे कडे चार्ज द्यावे लागण्याची नामुष्की या माध्यमिक शिक्षण विभागाच्या अशा प्रकाराने निर्माण झाली.मात्र पुढे यावर तोडगा कायम निघावा कायम स्वरुपी शिक्षणाधिकारी माध्यमिक विभागास मिळावा यासाठी संघटना प्रमुखांच्या प्रचंड दबावाने अखेर गेल्या फक्त पाच महिन्यांपासून पूर्वी प्राथमिक जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी म्हणून उत्कृष्ठ कार्य करणारे मोहन देसले यांचे कडे या धुळे जिल्हा माध्यमिक विभागाचा चार्ज सोपवण्यात आला.आणि त्यातून या विभागाने कात टाकायला खऱ्या अर्थाने सुरुवात देखील झाली.पुर्वीची शिक्षणाधिकारी यांची शासकीय वाहन फोर व्हिलर बंद पडलेले होते.हे नादुरुस्त वाहन स्वत: शिक्षणाधिकारी माध्य.मोहन देसले यांनी दुरुस्ती करून पुन्हा वापरायोग्य केले.शासनाचा मोठा पैसा वाचवला.कार्यालयातील थकलेल्या विजबिलांमुळे या कार्यालयातील सर्व इलेक्ट्रॉनिक कॉम्पुटर,ईमेल सेवा बंद झाली होती.ती फाडा जमा करून विज बिल भरून त्यांनी लाईटचा प्रश्न मार्गी लावला.सुंदर कार्यालयीन व्यवस्था बदलवण्याचा प्रयत्न केला.प्रत्येक कर्मचारींना बसण्यासाठी ॲल्यूमिनियम सेक्षण पार्टीशन करून कॅबिन बनवून देण्याचा प्रयत्न झाला.मात्र महत्वाचे काम म्हणजे या कार्यालयात रिकामटेकडे जे सतत फिरत या कार्यालयातील काही कर्मचारींना कमावण्याचे साधन करण्याची चिरी-मिरी घेण्याचा प्रकाराला आळा बसावा याचा पुढाकार घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धुळे यांचे कडून सिसिटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी यांनी प्रस्ताव टाकून मंजूर देखील करून आणत संपूर्ण कार्यालय सिसिटीव्ही च्या नजरेखाली आणले.यामुळे ज्यांना सोन्याची अंडी कमवण्याची सवय पडलेली होती त्यावर अंकुश



लागण्याचा निश्चित फायदा झालेला आहे.पुन्हा या कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक बाहेरील व आतिल इसमावर नजर ठेवण्याचे हे सिसिटीव्ही आपली महत्वपुर्ण कार्य करतांना दिसून येत आहे.

हे कार्यालय आता इतके अपडेट ठेवण्याचे काम स्वत: शिक्षणाधिकारी माध्य.जि.प.चे मोहन देसले करण्याचा प्रयत्न करत असतात की,स्वत:व्हाटसपवर नियमित शासनाकडून शैक्षणिक माहिती अपडेट पाठवण्यासाठी वेळोवेळी सातत्याने पुढाकार घेत माहिती मुख्याध्यापकांपर्यंत थेट पोहोचवत असतात.यातून शाळा व शासन असा सेतू खऱ्या अर्थाने तयार झालेला आहे.या कार्यालयात मात्र काही कर्मचारी अजूनही शिक्षक संघटना प्रमुख असतील,काही वृत्तपत्रांचे प्रतिनिधी असतील यांच्याशी चांगल्या पध्दतीची वागणूक देतांना दिसून

...पेज..०२ वर..

# सासरा आपल्याच सुनेवर संशय घेत गेला सुनेने सासऱ्याचा अखेर कायमचा काटाच काढला



गोपाल म्यांद्रे

अहमदनगर- चारित्र्यावर संशय घेण्याचे सासऱ्याला चांगलेच भोवले त्याच्या सुनेने कायमचा काटा काढण्याचा विचार केला आणि अखेर झाली ही मोठी घटना.घर संसारात रोजची काही ना काही कौटुंबिक वाद आपण रोज वाचतो.बघतो,ऐकतो मात्र चारित्र्याचा संशय इतका भयानक असतो की,तो एखाद्याचा कायमचा या जिवनातून नायनाटच होतो.अशीएक घटना अहमदनगर तालुक्यात घडली.नगर तालुक्याची चिचोंडी पाटील येथे मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली.अर्जुन हजारे (६२) असे या मृताचे नाव तर ज्योती हजारे असे आरोपी महिलेचे नाव आहे.



सासरा अर्जुन हजारे आपल्या सुनेवर वारंवार संशय घेत तीला रोज अश्लिल शिवीगाळ करण्याचा प्रकार करत होता.हेच मुळात सुन ज्योती हजारे हीला खटकत असे.आपल्या बापासारखा सासरा आपल्यावर असे घाणेरडे संशयाचे कट कारस्थान करतो,त्यातून तीला मनस्तापाला सामोरे जावे लागत होते.मात्र काय करावे तीला समजेना.अशाच प्रकाराने चारित्र्यावर वारंवार संशय घेत असल्याने संतापलेल्या सुनेने आपला सासरा अर्जुन हजारे (वय६२) याच्या डोक्यात वार करून दगडाने ठेचून व नंतर कुऱ्हाडीने घाव घालून निर्घृण खून केला.आणि सुनेने एकदाचा कायमचा नियतिने सासऱ्याचा काटाच काढला.बाबासाहेब बनकर यांनी सदर दिलेल्या आपल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अर्जुन हजारे यांचा मुलगा अतुल दोन वर्षापासून बेपत्ता आहे.हजारे हे सून आणि नातवंडासोबत राहत होते. हजारे हे सुनेच्या चारित्र्यावर संशय घेत होते.आणि याच कारणाने सून वैतागलेली होती.दोन वर्षापासून आपला पती एकतर घरातून बेपत्ता झालेला आहे.आणि त्यात मुलांचे संगोपन व सासऱ्याची देखरेख करणे हे काम तीला वाढलेले होते.सासऱ्याला मात्र सूनेच्या चारित्र्यावर संशय हा येतच होता.यातून मध्यरात्री त्यांच्यात भांडणही झाले.ज्योती हिने अर्जुन हजारे यांच्या डोक्यात,कपाळावर,तोंडावर,दगड व कुऱ्हाडीने मारहाण केली.या मारहाणीत ते गंभिर जखमी होऊन अर्जुन हजारे यांचा मृत्यू झाला.पोलीस तपास सुरू आहे.

# धुळ्यात मुख्य रत्यांवर स्टिट लाईट बंद !

## मनपा. आयुक्त लक्ष घालतील का?

धुळेमहानगर- धुळे शहराची महानगर पालिका नुसती नावालाच आहे का? ना धड रस्ते,ना गटारी,ना रस्त्यांवर स्टिट लाईट अशी बिकट अवस्थेला धुळेकर जनता सध्या या महानगरपालिकेच्या भोंगळ कारभारास पुर्णता: वैतागलेली आहे.महानगर पालिकेचे आयुक्त व महापौर लक्ष केव्हा घालतील? या बाबत धुळ्यात रोज खुंटावर,चौकावर चर्चा सुरू असते.मात्र महानगर पालिकेने फक्त आणि फक्त जनतेचा रोष आपल्यावर ओढवून घेण्याचेच महापाप चालवलेले आहे.

आता धुळे शहरातील मुख्य रस्ता म्हणजे जळगांव चौफुली ते शेतकरी पुतळा एमएसईबी पारोळा रोड सबस्टेशन पासून गेल्या चार दिवसांपासून मुख्य स्टिट लाईट बंद आहेत.सायंकाळी महिला वर्ग व वयोवृध्द तसेच तरूण मुले पाई चालण्यासाठी किंवा व्यायामासाठी जात असतात.मात्र या मुख्य रस्त्यावरील स्टिट लाईट सुरू करणारा मनपाचा लाईनमन नेमका कोण आहे? तो हे स्टिट लाईट सुरू करण्यासाठी येतच नसल्याची तक्रार आहे.हायवेवर फुलमाळा ट्रक चालकांना विक्री करणारा बिचारा रोज त्या स्टिटलाईट बाबत स्वत: फोन करतो मात्र स्टिट लाईट सुरू केले जात नाहीत अंधाराचा फायदा घेऊन महिलांना टारगट मुलांचा त्रास होत आहे.महिलांच्या अंगावरील दागिण्यांवर डल्ला मारला जावू शकतो यावर मनपा आयुक्तांनी लाईनमन वर कार्यवाही करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



निरज साळुंके

पान...०१ वरून..

# धुळे जिल्हा माध्य.शिक्षण विभाग टाकतोय कात!

## कर्तव्य दक्ष धुळे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी मोहन देसले यांच्या काम करण्याच्या जिद्दीला शिक्षक करतात सलाम!

येत नाहीत ही मात्र शोकांतीका म्हणावी लागेल.कार्यालयातील काही विभाग प्रमुख त्यांच्या कॅबिनला खरोखर काम तात्काळ करण्यावर भर देत असतो का? की, गप्पांसाठी मोठा वेळ यांना दिलेला आहे! हे मात्र समजू शकलेले नाही.कारण प्रत्यक्ष पोलीस व्हिजन ने याबाबत प्रत्यक्ष परिस्थिती निरीक्षणातून व अनुभवातून जाणवून घेतली आहे.प्रसंग होता आत्ता बारावीला बोर्डाचा फॉर्म भरण्यासाठी एका विद्यार्थीनीच्या इयत्ता दहावीच्या गुणपत्रकावर व प्रमाणपत्रावर नावात स्पेलींग मिस्टेक झालेली असल्याचा.यासाठी मुलिचे आई वडील मुंबई येथे राहतात.त्यांनी आपल्या मुलीचे हे चुकीचे नाव दुरुस्ती साठी संबंधित शाळे कडे अर्ज केला.संबंधित शाळेचे मुख्याध्यापक अतिशय सहानुभूतीपुर्वक व विद्यार्थी हितासाठी तात्काळ काम करणारे व्यक्तिमत्व असल्याने त्यांनी तात्काळ दखल घेत इ.१०वी चे वर्गशिक्षक,आपले शाळेचे लिपीक यांना या कामी माध्यमिक शिक्षण विभागाकडे पाठवले.मागिल आठवड्यात यावर कार्यतत्पर शिक्षणाधिकारी माध्य.मोहन देसले साहेब यांनी तात्काळ स्वाक्षरी करून सदर प्रस्ताव शाळा मुख्याध्यापकांकडे पाठवला.तो प्रस्ताव बोर्डाकडे पाठवला.परंतू तेथून पुन्हा काही किरकोळ तृटी आल्याने हे प्रकरण पुन्हा शिक्षण विभागाकडे पाठवले.तेथून संबंधित टेबल वरील लिपीक.यांचा सल्ला घेऊन त्यास विद्यार्थीनीचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल मार्गदर्शन केले.संबंधित शाळेच्या कर्मचारींनी तात्काळ त्याचीही पुर्तता केली.मात्र हे करत असतांना माध्य.शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी कार्यालयातील कॅबिन मध्ये कर्तव्य दक्ष शिक्षणाधिकारी मोहन देसले आपल्या कामात व्यस्त होते.त्यांना मी स्वता: या पालक,शिक्षक,लिपीक यांचे सोबत




कार्यालयातून बाहेर जातांना दिसलो.साहेबांनी कोणताही बाऊ न करता किंवा मी अधिकारी आहे.असे न भासवता प्रेमाणे हाक मारली.अहो साळुंके सर मला न भेटताच असेच निघून चालले कसे? काही काम होते का? मी थोडा आर्श्चर्य चकीत झालो.साहेबांचे येवढे आपुलकीने सामान्य शिक्षकांकडे लक्ष देणे,त्यांच्यावर प्रेमाणे काही काम आहे का? विचारपुस करून होईल ते सहकार्य करण्याची त्यांची मनाची इच्छा शक्ती फार मोठी यातून जाणवली.त्यांना भेटून प्रत्यक्ष त्या विद्यार्थीनीचे नाव दुरुस्तीबाबत प्रतिज्ञापत्र करून आम्ही तुमच्या कडे स्वाक्षरीसाठी येणारच होतो.आमचा उद्देश येवढाच होता आपले कागद पत्र पुर्ण करून साहेबांना भेटावे.मोहन देसले साहेबांनी तात्काळ सांगितले आणा लवकर प्रतिज्ञापत्र करून, मी इथेच आहे देतो विद्यार्थीनीचे काम करून.कामात व्यस्त असलेल्यांचा उगाच वेळ कुणी वाया घालू नये! तेव्हा कार्यालय एक विभाग प्रमुख या देखील तीथे उपस्थित होत्या.साहेबांनी या विद्यार्थीनीचा प्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी दाखवलेले कर्तव्य त्यांच्या लक्षात यायला हवो होतो.पण......त्यानंतर पालक,विद्यार्थीनी,संबंधित वर्ग शिक्षक,लिपीक व मी स्वत: तहसील कार्यालयात जावून तात्काळ प्रतिज्ञा पत्र करून ते संबंधित महिला लिपीक चव्हाण यांना भेटून सादर केले.त्यांनी त्यावेळी म्हणे माझी तब्बेत थोडी बरी नाही! लावला ब्रेक...टपालात टाकूण द्या.होईल!अशी वेगवेगळी कारणे द्यायला लागले.तेव्हा विद्यार्थीनी बारावी बोर्डाचा फॉर्म भरणार आहे.तीचे शैक्षणिक नुकसान होईल द्या हो करून अशी विनंती संबंधित शिक्षक,लिपीक करत होते.मात्र नाही.यामुळे पोलीस व्हिजनला दखल घ्यावी लागली.मॅडम द्या करून



विद्यार्थीनीचे शैक्षणिक काम आहे.शिक्षणाधिकारी साहेबांना माहिती दिली आहे.त्यांनी तयार करून आणा सांगितले आहे.तरी नाही म्हणून टाळाटाळ होऊ लागली.विद्यार्थीनीस एकटीला यांनी काय काम करून दिले असते? हा प्रश्न येथे प्रत्यक्ष ही परिस्थीती पाहिल्यावर लक्षात आले.नंतर संबंधित लिपीक चव्हाण या विद्यार्थीनीचे काम करून देण्यास तयार झाल्या त्यांनी कागद हाती घेतले.टिप्पणी केली.आणि स्वाक्षरीसाठी आता समोरच गप्पांमध्ये रंगलेले कार्यालयीन प्रमुख यांचे टेबलावर कागद पत्र ठेवले.मात्र त्यांनी त्यावर स्वाक्षरी करण्यास फार उशिर केला.शिक्षक,विद्यार्थी,पालक ,लिपीक यांचे दोन तास वाया घातले.प्रत यक्षात शिक्षणाधिकारी तात्काळ काम करणारे व्यक्तिमत्व आहेत.त्यांच्या कडे या कार्यालयात काम येवढ्या वेळ अडकवून पडत नाही.मात्र या कार्यालयातील । काही कर्मचारी अजूनही जुन्या वाईट सवई सोडण्यास तयार नाहीत का? वास्तवीक या कार्यालयाच्या भिंतीवर विविध सुचनांचा,कलमांचा भडिमार बराच आहे.त्यात अनेक सुचना लावल्या आहेत..यात फक्त असे जाणवले की,शासकीय कर्मचारींशी उध्दट पणे वागलात तर ....कलमान्वये कार्यवाही!मात्र शासकीय कर्मचारी किंवा बाहेरील सामान्य जनता,शिक्षक,पालक,मुख्याध्यापक कामानिमित्त या कार्यालयात आले आणि त्यांना व्यवस्थित वागणूक या शासकीय कर्मचारींनी दिली नाही तर त्यांच्यासाठी एकही नियम वा कलमच नाही? हे कसे होऊ शकते! आपल्या भारतीय संविधानाने तर प्रत्येकाला समान न्याय व कायदे दिलेले आहेत.अधिकार दिलेला आहे.शासकीय कर्मचारी खरंच काहो सर्व सामान्य माणसांची तात्काळ काम करून मोकळे होतात.त्यांना चांगली वागणूक देतात! हे शोधणारा कॅमेराच या माध्यमिक शिक्षण विभागात बसला पाहिजे तेव्हा आमचा धुळे जिल्ह्यातील इतीहास बदललेला आम्हाी पाहू अन्यथा येरे...माझ्या....मागल्याच... कार्यालयात शिक्षणाधिकारी साहेबांच्या कॅबीनमध्ये जाण्या अगोदर मला एक चांगली सुचना नंतर वाचायला मिळाली.

**कामे पडली अनंत,**
**वेळ मात्र मर्यादित !**
**म्हणुनि व्यर्थ बोलण्यात**
**कालक्षेप करू नये !!!**

हे वाचून जरा मी विचारात पडलो.हे येथे का लावलेले असावे.शिक्षणाधिकारी हे तंतोतंत पाळणारे अधिकारी आहेत.जेथे याला लावणे गरजेचे आहे तेथे हे लावलेले नाही.आणि जेथे लवकर काम होते त्याच अधिकारी यांच्या कॅबिन समोर हे लावलेले दिसले.याची मुळात जागाच चुकीची वाटली ! याची जागा जे कार्यालयात जनतेची कामे कमी करतात व गप्पा हासडतात.शासनाचा पगार घेऊन जनतेला तासन तास वेठीस धरतात त्यांच्या कार्यालयासमोर त्यांच्या कॅबीन मध्ये हे लावले तर १० टक्के तरी जनतेची कामे लवकर होतील असे जाणवते.

नंतर तेथे एक सुचना अजून वाचण्यात आली.**हेल्मेट नाही तर कार्यालयात प्रवेश नाही.**

**हे जरा वेगळे वाटले.** कार्यालयात येतांना हेल्मेट हे जरा वेगळे वाटले कदाचीत या कार्यालयातील कर्मचारींनी घरून निघतांना हेल्मेट घालुन कार्यालयापर्यंत यावे असे असेल!! या कार्यालयात एकाद दुसरा कर्मचारी सोडला तर कुणाऱ्याही नाकातोंडावर मास्क नाही.कोरोणाची भिती दाखवणारे व विद्यार्थ्यांची काळजी करणारे माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयातच हे जरा हटके सुरू असल्याचे शासनाच्या नियमांना तिरांजली देण्यासारखे वाटले.तेवढ्यात सव्वा तिन वाजता शिक्षणाधिकारी मोहन देसले साहेब जेवण करून तात्काळ आले.आणि ऑनलाईन विशेष शिक्षकांची व्हिसी.सुरू होती तिथे बसले.काही मिनीटात त्यांची नजर आमच्यावर पडली.अरे सर व पालक त्याच कामासाठी दुपारी १२ वाजेपासून आता ३.३० पर्यंत उभे आहेत.त्यांनी व्हिसी चालू असतांना हाताने इशारा करत आत बोलावले आणा कागदपत्र एका सेकंदात स्वाक्षरी केली.याला म्हणतात जाणकार अधिकारी कोणत्या कामाला किती महत्व द्यावे आणि समोर कोण व्यक्ति या कामासाठी आलेले आहेत.याची जाण ठेवणाऱ्या शिक्षणाधिकारी माध्य.मोहन देसलेंना शिक्षकांना खऱ्या अर्थाने समजून घेणारा अधिकारी म्हणून आज संपुर्ण धुळे जिल्ह्यातील शिक्षक त्यांना मानतो आहे.

या प्रसंगातून आपण समजू शकत असाल की,आपण चांगले करत असणार त्याची देखील कुणीतरी चांगलीच दखल आपोआप घेत असते.आणि आपण वाईट काम किंवा जनतेला वेठीस धरण्याचे काम करत असणार तेही दुर्लक्षीत होत नसते.त्याचा देखील विचार होत असतो.

मात्र प्रामाणिक पणे आता कर्तव्य दक्ष धुळे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी मोहन देसले यांच्या मुळे या शिक्षण विभागाने कात टाकायला खऱ्या अर्थाने सुरवात झालेली आहे.त्यांचे कामाचे कौतूक आहे.होणार आणि त्यांच्या कामावर काही हेकेखोरीने अडथळा आणणाऱ्यांची उचलबांगडी सोन्याच्या अंडे देणाऱ्या टेबल वरून केव्हाच झालेली आहे.मात्र त्यांना कमावण्याची जी सवय लागलेली होती त्यामुळे त्या इतर टेबलवर काम करण्यास बेचैन झालेल्या असाव्यात.म्हणून आपल्या कार्यालयास शिस्त लावण्याचा प्रयत्न करणारे चांगले शिक्षणाधिकारी म्हणून मोहन देसले यांची वर्णी धुळे जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागास लाभणे हे देखील या पवित्र शिक्षण विभागास नशिब म्हणावे.म्हणून अशा कर्तव्य दक्ष व चांगल्या अधिकारींचे गुण व त्यांची तळमळ बघता कार्यालयातील सर्व कर्मचारींनी त्यांना साथ देणे गरजेचे आहे.कार्यालयात आलेल्या शिक्षकांना आदरार्थी वागणूक देत त्यांचे काम काय आहे? हे व्यवस्थित समजून घ्या.त्यांना होण्यासारखे असेल तर लागलीच काम प्रथम चक्कर मध्ये करून देणे सोईचे होईल.यातून शिक्षण विभागाबद्दल आदर वाढण्यास मदत होईल.शिक्षणाधिकारी मोहन देसले यांना आपल्या कार्यालयाची चांगल्या प्रकारे सुधारणा करून आज एक आदर्श माध्यमिक शिक्षण विभागाचे नावारूपाला आणलेले नावाचे नाशिक विभागाचे पदविधर शिक्षक आमदार डॉ.सुधीर तांबे हे देखील त्यांच्या कामातून खूष झालेले आहेत.वेळोवेळी काय अडचणी आहेत ते देखील समजून घेत असतात.व शिक्षणाधिकारी मोहन देसले यांना मदतीसाठी तत्परता दाखवण्यासाठी पुढे असतात.हे प्रत्यक्ष चांगल्या कामाचा अधिकारीच वरीष्ठांचे चांगले आशिर्वाद मिळवू शकतात.यात शंका नाही.मोहन देसले शिक्षणाधिकारी माध्य.जि.प.धुळे यांच्या कामाला सा.पोलीस व्हिजन चा सलाम.

# शेवाळी येथे पिण्याचे पाणी दुषीत येत असल्याची नागरीकांची तक्रार

साक्री- साक्री तालुका येथील शेवाळी(दा) या गावात ग्रामपंचायत च्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने पिण्याचे पाणी दुषीत येत असल्याचे नागरीकांना आढळुन आले.सदर पाण्यास फेस येत असल्याने ही गंभिर बाब असल्याचे बोलले जात आहे.या दुषीत पाण्याचा पुरवठा गेल्या चार ते पाच दिवसांपासून होत असल्याचे नागरीकांकडून बोलले जात आहे.काहींनी या पाण्याला विचित्र दुर्गंधी येत असल्याचे देखील जाणवले आहे.मागील एप्रील महिन्यात या गांवात कोरोणाची लाट प्रचंड प्रमाणात होती.काहींचे म्हणणे होते की, गांवातील या दुषीत पाणी मुळेच हा प्रकार वाढला असावा.गावात त्या वेळी अंदाजे ६९ ते ७५ लोकांचा मृत्यू झालेला आहे.मात्र तो पाण्यातुन झाला होता का? याची कोणीही चाचणी त्यावेळी करून घेत खात्री केलेली नव्हती.परंतू आता या गेल्या चार पाच दिवसांपासून पुन्हा या पिण्याच्या पाण्यातून फेस येणे,दुर्गंधी व दुषीत पाण्याचा पुरवठा होत असल्याच्या नागरीकांच्या तक्रारी पोलीस व्हिजन कडे आलेल्या आहेत.ग्रामसेवक यांनी



तातडीने हा गंभिर प्रश्न मार्गी लावणे गरजेचे असल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.काहींनी फोन वर सदर बाब गंभिर असल्याचे पोलिस व्हिजन ला सांगितले.यावेळी ग्रामस्थांनी काळजीने राहणे गरजेचे आहे.पाण्यापासून ताबडतोब विविध आजारांना आमंत्रण मिळत असते.म्हणून जरा काळजी घेणे आरोग्याच्या दृष्टीने गरजेचे आहे.ग्रामपंचायत प्रशासन यावर तात्काळ उपाय योजना करण्यासाठी आता केव्हा सतर्कता दाखवते!यावर आता अवलंबुन आहे.असे मत काही ग्रामस्थांनी बोलुन दाखवले आहे.

सुचना-सा.पोलीस व्हिजन वृत्तपत्रातील छापील सर्व जाहिरातीव त्यातील दर्जेदार वस्तूंचा दावा हा त्या त्या जाहिरात देणाऱ्या दुकानदाराशी निगडीत असतो.तसेच प्रतिनिधींनी दिलेल्या बातम्यांशी मुख्य संपादक,मालक,प्रकाशक,हे सहमत असतीलच असे नाही. (वाद धुळे न्यायालयांतर्गत असे)
वरीष्ठ सल्लागार- मा.ॲड.नाना अहिरे (उच्च न्यायालय,मुंबई), ,मुख्य सल्लागार-ॲड.पराग एम.पाटील(धुळे न्यायालय),ॲड.मोहन साळुंके (शेवाळी)ता.साक्री.जि.धुळे

साप्ताहिक पोलीस व्हिजन हे मालक,प्रमाशक,संपादक,श्री.प्रल्हाद गोविंदराव साळुंके यांनी मुद्रक श्री.अक्षय अनिल सावजी यांच्या ओमकार प्रिन्टर्स,सावजी कॉम्प्लेक्स,ग.नं.4,बेसमेंट,सि.स.न.13 घ.नं.18/100,धुळे येथे मुद्रीत करुन साप्ताहिक पोलीस व्हिजन, 72,स्वामी नारायण सोसायटी मार्केट यार्ड,धुळे (महाराष्ट्र राज्य) येथून प्रकाशित केले.भ्रमणध्वनी- 9881404361 .,MAHMAR 35824/13/1/2009-TC कार्यालय पत्ता- 72 स्वामी नारायण सोसायटी मार्केट यार्ड,धुळे (महाराष्ट्र)424001

# गुन्हेगार आणि कायदे... कठीण पण सोपेही

गुन्हेगार गुन्हे करतो म्हणून कायद्याचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरते. परंतु आज कायदे हाताळायचे जेवढे कठीण झाले आहे, तेवढे सोपेही आहे. एखाद्या गुन्ह्यामध्ये एखादा आरोपी त्याने केलेली चूक मान्य करतो व घडलेली घटना पोलिसीखाक्या दाखल्यावर विषद करतो. उदा. एखाद्या व्यक्तिने एखाद्याचा खून केला, खुणात वापरलेले हत्त्यार रक्ताने माखलेले कपडे ही पोलिस जप्त करतात. सर्व काही पुरावे तात्काळ मिळाल्यावर कलम कोणते लावावेत त्याचा पोलिस विचार करतात, त्याप्रमाणे कलम लागतो. ४९८ कलम मध्ये ९० दिवस जामिन होत नाही. एखाद्या विवाहित स्त्रीला जाळले जाते. तीचा मृत्यूपूर्व जबाब होतात. त्यांनाही वरील प्रमाणे शिक्षा होते. ९० दिवसानंतर जामिन मिळतो अथवा मिळवून आणतात. नंतर तारीख पे तारीख, तारीख पे तारीख चालतच राहते आणि कुठेतरी माशी शिंकते. ती माशी इतकी वजनदार असते की, सोन्याची अंडी देणारी कोंबडीच असते किंवा परिससारखा सर्व काही बदल होतो आणि लोखंडालाही सोन्याची किंमत येऊन जाते. खरा आरोपी हा त्यावरील आरोप सिध्द झाले नाही म्हणून निर्दोष मुक्त होतो, परंतु माहेरकडील म्हणजे समोरच्या व्यक्तिंचा संसार उध्वस्त होतो आणि जे काही दुःखाने व्याकूळ झालेले कुटुंब निराष होऊन दुःख सहन करत गुदमरत खाली मान घालून निमुटपणे सहन करत यातना भोगतात. ह्या सर्व गोष्टीला सर्वस्वी जबाबदार कायदा राबवणारे किंवा संरक्षण देणारे पोलिस खाते, बचाव खाते. मग साधारण व्यक्तिने ह्या कायद्याला कोणत्या पध्दतीने हाताळायचे हे त्याला कळतच नाही. एखाद्या स्त्रीचा सासरी मानसिक, शारिरीक त्रास देऊन छळ केला जातो. ती बिचारी जुन्या म्हणी प्रमाणे ''दिल्या घरी तू सुखी रहा'', असे आई–वडिलांनी दिलेल्या आशिर्वादास सर्वस्व मानत सुखी असो अथवा दुःखी असो जगत असते. तरीही थोड्याच दिवसांनी पती, सासरे, सासू, नणंद, दिर, जेठ, जेठाणी हे सर्व कुटुंब त्या एकट्या सुनेचा मागे लागत छळ करून करून शेवटी जाळण्याचा प्रयत्न किंवा जाळून ठार मारण्यापर्यंत मजल मारतात. नंतर तेच पेटवणारे शावसुद होऊन परत त्याच सुनेला दवाखान्यात नेतात व मी त्यातला नव्हे, अशी भूमिका समाजाला दाखवतात. परस्पर जाबजबाब होऊन जातात. आरोपींना तेवढ्यापुरती अटक करून शिक्षा होते. ९० दिवसांनी जामिनावर सोडवण्यासाठी कायदे त्या पापी लोकांना कायद्यावर पांघरूण घालून सोडवतात. नंतर तारखा चालतात आणि कायद्याचे चिलखत घालून फिरणारे दोन्ही पक्षातले कायदेतज्ञ एकमेकांच्या कायद्याच्या चिलखतावर शब्द फेकतात. ज्याचं चिलखत कमकुवत राहतं त्या चिलखतावर आत शिरतात, ते कायद्याचे शब्द आणि शेवटी आरोपी हे आरोपी म्हणून राहातच नाही. मात्र फिर्यादी हेच आरोपी होऊन हताश होऊन घरी परततात. तज्ञ अभ्यासू वकील स्वतःची प्रशंसा म्हणून वृत्तपत्रातून लेख देत असतात. या लेखातून हेच दिसते कि शब्दांच्या माझ्या फेकाफेकीने समोरचा गार झाला माझे शब्द उलट–सुलट करून आरोपी असूनही सुध्दा तो निष्पाप कसा आहे ते मी सिध्द केलेच आणि निर्दोष मुक्तता करून दाखवलीही. एखाद्या घटनेमध्ये खरोखरच आरोपी निर्दोष असेल आणि निर्दोष मुक्तता झाला, तर अशा वकीलांचे कौतकही समाज करतो व आपोआप नावलौकीकता मिळते, मात्र असे वाटते कायदे हाताळायला जेवढे कठीण आहेत ना, तेवढेच सोपेही आहेत. परंतु शास्त्रज्ञ खुप पुढे गेलेले आहेत. विज्ञान युगाची फारच वाह... वा... होत आहे. आरोपीचे आता ब्रेन मॅपींग व लाईव्ह डिटेक्टीव्ह चाचणी केली जाते, करता येते. मात्र फिर्यादीकडील दहा व्यक्ती व आरोपीकडील दहा व्यक्तींच्या समोर म्हणजे आरोपीला फिर्यादी व्यक्तिने २५ प्रश्न विचारण्याची संधी दिली गेली पाहिजे म्हणजे आरोपी सहजा सहजी सुटू शकणार नाही व योग्य शिक्षा देण्यास त्यास पात्र समजले पाहिजे.

जोपर्यंत अशा कायद्यांमध्ये सुधारणा होत नाही तोपर्यंत ह्या घटना घडतच राहणार. सुनेला सहज जाळले जाते व ती स्टोव्हच्या भडक्याने म्हणा, पेटती चिमणी पडल्याने म्हणा अशा शुल्लक कारणाने ती पेटली भासवले जाते. परंतु दमदाटी देत असच सांग, नाहीतर मेली दवाखान्यात सुध्दा नेणार नाहीत. तिला पेटून गेल्यावरही जगण्याची इच्छा असते. ती तसच सांगते. जबाब लिहिला जातो, कारण माहरेकडेच कोणीच तिथे नसतात. मात्र माहेरकडील मंडळी आली की मग सर्व बदलते. मात्र जबाब घेणारे आधिच मॅनेज झालेले, केलेले असतात. त्यामुळे मुलीच्या माहेरकडच्या व सासरकडच्या मंडळींमध्ये दवाखान्यातच हाणामाऱ्या होतात. कोर्टात साक्षीदार बदलला जातो. त्याला असे काही पाहिले नाही सांगितले जाते. साक्षीदार बदलला म्हणजे केस लुज पडते. आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र ठरतो. कोर्टाला साक्षी, पुरावे लागतातच, परंतु काही सत्य घटना घडूनही साक्षीदार नसल्यामुळे गुन्हेगार सुटतो. आई ९ महिने मुलीस आपल्या गर्भात सांभाळते, वाढवते, शिकवते. शेवटी पोटचा गोळा लग्न करून दूर करत मोठे मन घट्ट करते. संसाराला लागेल माझी पोरं, सारं दुःख आर्थिक बाजू सांभाळून जबाबदारी पेलवून लग्न करून देते. हिच मुलगी पुढे जाळली जाते. त्या अशा उजाळलेल्या दिवसाचं दुःख किती असते याची यत्किंचीत हा कायदा मात्र करत नाही. आरोपी मोकळे होतात. आपण पहातो ग्रामीण भागात असो की, शहरी कितीतरी स्टोव्ह दुरूस्ती करणारे कारागीर फिरतात. दिवसातून २०–२५ वेळा स्टोव्ह दुरूस्ती करतांना स्टोव्हचा भडका होतो. एखादा स्टोव्ह दुरूस्ती करणारा जळाला, असे वाचण्यात किंवा ऐकवण्यात आले नाही. तसेच बिचारे विळा, खुरपे बनविणारे पंचाळ हे उघड्यावर भाताने हावा फुंकत भट्टीवर अवजारे तयार करतो तरी जळत नाही. मग सुनच का जळते? मुलगी माहेरी असते तेव्हा तेथे कशी जळत नाही? एक स्टोव्ह रीपेअरींग करणाऱ्याने वृत्तपत्रात असे दिले होते की, ''कौन कहता है की स्टोव्ह के भडकेसे औरत जलती है । स्टोव्ह के भडकेसे औरत जलती नही है । उसे तो जलाया जाता है ।''



**प्रल्हाद साळुंके**
संपादक,
सा.पोलिस व्हिजन, धुळे
**मोबा-९८८१४०४३६१**

# ''स्त्रीभ्रूणहत्या '' थांबवण्यासाठी सरकारकडून प्रयत्न चाललेले पुरेसे आहेत!

आजच्या स्त्रीया ह्या पुरूषांपेक्षा कुठेही कमी नाहीत.स्त्री शक्तीचे अनेक उदा. आपल्याला अगदी पूर्वीपासून पहायला मिळतात.कुलंद गड उतरून बाळासाठी आसुसलेली हिरकणी म्हणा किंवा पाठीशी बाळाला बांधुन रणांगणात उतरणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई म्हणा स्त्रीचे अनेक रूप आपण पाहीले आहेत.राष्ट्रपती,पंतप्रधान अशी अतिशय महत्वाची व मानाची पदे त्यांनी यशस्वीरीत्या समर्थपणे व कणखरतेने सांभाळली.आजाच्या स्त्रीया ह्या शास्त्रज्ञ,डॉक्टर,वैज्ञानिक,वैमानिक,इंजिनिअर तार आहेतच पण ट्रेन ड्रायव्हर व रिक्षा ड्रायव्हर,महिला पोलीस, देखील आहेत.त्यांनी ऑफिसच्या कामातसुध्दा आपली गुणवत्ता व कार्यक्षमता पुरूषांच्या बरोबरीने सिध्द केलेली आहे.

एकीकडे स्त्रीशिक्षणाची प्रगती होत असतांना दूसरीकडे स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाणही वाढत चालले आहे.आजी,आई,बहीण,पत्नी व मुलगी ही स्त्रीची अनेक रूपे आपण बघतो.परंतु एक आहे यात पुरूषांचा सहभागतर असतोच त्यापेक्षा जास्त स्त्रीयांचा कृतीशील सहभाग असतो.मुलगी झाली म्हणून सुनेचा छळ करणे किंवा वेळ प्रसंगी तीची हत्या करण्याचे प्रकार सर्रास चालतात.त्यामुळे स्त्रीशिक्षणाची दिशा परत एकदा तपासुन पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.कारण मुलगा हा वंशाचा दिवा किंवा म्हातारपणाची काठी असतो.या मानसिकतेचा पगडा शिक्षित स्त्रियांवर देखील आहे.

आपल्या देशात रूढी परंपरेने स्त्रीचे स्थान हे पुरूषांच्या तुलनेत दुय्यम आहे.मुलगा झाला तर आयुष्याचे सार्थक झाले व मुलगी झाली म्हणजे नशीब फुटले अशी भावना सर्वत्र दिसून येते.मुलगी नको म्हणून जबरदस्तीने गर्भपात करायला भाग पाडले जाते.आज देशात मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत कमी झाली आहे.सरकारकडुन 'स्त्रीभ्रृणहत्या' थांबविण्यासाठी अनेक प्रयत्न चालु आहेत.

भारतात गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा १९९४ साली सुरू करण्यात आला.यात २६ महिलांना मुलींपेक्षा मुलगाच हवा असे दिसुन आले.गेल्या शंभर वर्षात म्हणजेच २००२ सालच्या शिरगणित नुसार तर १००० पुरूषांमागे ९२२ स्त्रिया ही भारताची सरासरी आहे.महाराष्ट्र,पंजाब,हरियाणा,इ.राज्यात तर हे प्रमाण त्याहुनही कमी आहे. मुली नकोशा असलेल्या या देशात स्त्रियांवर अत्याचार त्यांच्या जन्माआधी सुरू होतो.कळी उमळल्या आधीच ती तोडली जाते.मुलींची जन्मा अगोदरच

पेज नंबर..४ वर वाचा....

# शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणीचे शुल्क नको महाराष्ट्र राज्य कलाशिक्षक महासंघाची मागणी

अमरावती- माध्यमिक शाळेचा शिक्षक म्हटला की,त्यांना या ना त्या प्रकारे समस्यांना सामोरे जावे लागते.शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणारा शिक्षक वर्ग आपल्या स्वत:च्या शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या वरिष्ठ व निवडश्रेणी साठी प्रशिक्षणापासून गेल्या पाच ते सहा वर्षापासुन वंचित राहिला आहे.शासनाने शिक्षकांसाठी हे प्रशिक्षण घेण्याचे नियोजनच केले नाही.त्याचा फटका अनेक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा १२ वर्षाचा सेवाकाळ पुर्ण होऊन त्या पुढे पाच सहा वर्ष जास्त झालेत तसेच निवड श्रेणीसाठी पात्र सलग २४ वर्ष सेवा झालेले अनेक शिक्षक शासनाकडून या वेतनश्रेणी देण्यासाठी प्रशिक्षण आज पर्यंत घेऊच शकले नाही.त्यामुळे असे राज्यातील बहुसंख्य शिक्षक या वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी वंचित राहिले आहेत.मात्र आता शासनाने नुकतेच परिपत्रक काढले आणि शिक्षकांना निदान एक आनंदाची बातमी मिळाली की,आता ऑनलाईन वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण शासन घेण्याचा प्रोग्राम बनवून तो जाहिर देखील झालेला आहे.मात्र यातील शुल्क प्रत्येकी २०००/-दोन हजार रुपये पोर्टल नोंदणी वेळी ठेवल्याने शिक्षक वर्गात प्रचंड शासनाविरुध्द रोष निर्माण झाला आहे.शासनाने पत्र क्रमांक- राशैसं प्रपम/सेवापुर्व प्रशिक्षण (एसबीटीई) २०२१-२२/३८७१ दिनांक-२२/११/२०२१ रोजी श्री.एम.डी सिह,संचालक,राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या आदेशान्वये राज्यातील शिक्षकांसाठी हे परिपत्रक काढलेले आहे.यातील मुद्दा क्र.१४ अन्वये शिक्षकांना हे प्रशिक्षण पुर्ण करण्यासाठी दोन हजार रुपये मोजावे लागणार आहेत.यावर शिक्षकांच्या खिशाला ते परवडणारे पेक्षा मागिल इतिहासात कधीही शिक्षकांना पैसे देऊन प्रशिक्षण घ्यावे लागले नाही.परंतु आज राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी काढलेल्या परिपत्रकात प्रशिक्षण घेण्यासाठी दोन हजार रुपयांची शुल्क आकारणी म्हटल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या.राज्यातील कलाशिक्षक व क्रीडाशिक्षक तसेच








सर्व भाषा विषय अध्यापन करणारे शिक्षकांना या शासनाच्या या निर्णयामुळे असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असुन प्रथमच महाराष्ट्र राज्य कलाशिक्षक महासंघाने या अशा प्रशिक्षणास शुल्क रद्द होण्यासाठी निवेदन सादर केले आहे.शालेय शिक्षण मंत्री मुंबई तसेच श्री.एम.डी.सिंह,संचालक राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांना निवेदन सादर करण्यात आले असून महाराष्ट्र राज्य कलाशिक्षक महासंघाचे प्रदेश अध्यक्ष विनोद इंगोले,अमरावती यांनी सदर प्रशिक्षण विनाशुल्क देण्याची मागणी केली आहे.तर प्रदेश उपाध्यक्ष प्रल्हाद शिंदे,किरण सरोदे,सहचिटणीस मिलिंद शेलार,प्रदेश कोषाध्यक्ष राजेश निंबेकर,प्रदेश सदस्य विवेक महाजन,नवाब शहा,रमेश तुंगार सर,प्रदेश सल्लागार खान हुसेन चाचा पुणे,सुनिल महालेसर धुळे,प्रभाकर शेलार सर,नगर,अजय भदाणे सर,दत्तात्रय सांगळे सर,नरेंद्र गुरव सर,पि.डी.बाविस्कर सर,रामचंद्र इकारे सर,सुहास पाटील सर, संजय पवार सर,महेंद्र निकुंभ सर,मोहन माने सर,उमेश पवार सर,गजानन भोरळ सर,रावसाहेब शिंदे सर,आशिष चौथे सर,चंद्रकांत लिंबेकर,भारती जाधव अनिल ठाकरे सर सौ.भारती जाधव मॅडम,मुंबई यांनी या निवेदनास समर्थन केले आहे.तर महाराष्ट्र राज्य कलाशिक्षक महासंघाचे प्रदेश सरचिटणीस प्रल्हाद साळुंके यांनी सदर प्रशिक्षण देतांना जे शिक्षक अतिरिक्त ठरले असतिल व दुसऱ्या शाळेत समावेशन झालेले असेल अशा शिक्षकांना पहिल्या शाळेतील नोकरीचे वर्ष व समावेशन झालेल्या दुसऱ्या शाळेतील वर्ष सलग १२ वर्ष सेवाकाळ पुर्ण धरुन अशा शिक्षकांना देखील वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षणाचा लाभ उपलब्ध्द करण्याची महत्वपुर्ण मागणी केली आहे.सदर प्रशिक्षणाचे नियोजन कलाशिक्षकांसाठी ऑनलाईन स्वतंत्र घेण्याचे देखील या मागणीत महासंघाने केली आहे.राज्यातील शासनाने शिक्षकांना या प्रशिक्षणासाठी विनाशुल्क पोर्टल मध्ये दुरुस्ती करण्याची मागणी केली असून नाशिक विभागीय शिक्षक आमदार डॉ.सुधीर तांबे यांनी महासंघाच्या या निवेदनाव्दारे शालेय शिक्षण मंत्री यांचे सोबत तातडीने चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावून या प्रशिक्षण कार्यक्रमाची नाव नोंदणी मुदत वाढवून देण्याची महाराष्ट्र राज्य कलाशिक्षक महासंघाची मागणी आहे.

# धुळ्याच्या वाहतूक शाखेस वाली आहे तरी कोण ?

धुळे- धुळे शहराचा वाढता लोकसंख्येचा विस्ताव व धुळे शहराच्या चारही बाजूंचे खेडे पाडे हे धुळे शहर जिल्ह्याचे शहर असल्याने शासकीय सर्व विभागांच्या महत्वपुर्ण कामानिमित्ताने येथे दुचाकी,चारचाकी वाहनांनी येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.यातच वाहतूकीची कोंडी ही फार मोठ्या प्रमाणावर धुळेकरांसाठी डोकेदुखी ठरत आहे.यातच धुळे शहरातील पोलीस प्रशासनाचा दबदबा हा कमी झाल्याने येथील काही तरूणाई आपल्या जोरात मोटरसायकल बाईक चालवण्याचा स्टंट करतांना दिवसा ढवळ्या जनतेस नजरेसमोर येत असतात.यामुळे वाहतुकीस कोंडी निर्माण होणे,कट मारणे,गाडीचा कर्कश हॉर्न वाजवणे सायलेंसर मध्ये बदल करून मोठ्याने आवाज काढणे ध्वनी प्रदुषणाचा त्रास करणे.असे प्रकार सर्रास होतांना दिसून येत आहेत.मंगळवारी बाजाराचा दिवस असल्याने कृषी मार्केट पारोळा रोडवर प्रचंड प्रमाणात वाहतूकीची कोंडी होत असते मात्र येथे वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी नसतात.मार्केट जवळील हॉटेल व त्यासमोर रस्त्यात पडलेले मोठे टेबल,टोपले,टुव्हिल रस्त्यावर लावल्यामुळे येथे वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असते.येथुन मार्ग काढणे फार जिकरीचे होते.तसेच गोपाल टी समोर काही व्ही.आय.पी समजणारे आपली चार चाकी वाहन खुशाल रस्त्यावर उभे करून वाहतुकीची या मुख्य रस्त्यावर अडथळा करण्याचा प्रयत्न करत असतात मात्र येथे बंदपडलेल्या सिग्नल जवळ गोपाल टी च्या हाकेवर दोन ते तीन वाहतूक शाखेचे पोलीस उभे असुनही ते या चारचाकी वाहणधारकांना चहा घेण्यासाठी थांबलेले असतांना का हटकत नाहीत? यांना कायदा वेगळा आहे का? कायदा तर समान असतो मग खऱ्या अर्थाने ट्रॉफिक जाम करणाऱ्यांनवर का कार्यवाही करत नाहीत? याऊलट येथील वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी जे प्रामाणिक कुटुंब आपल्या कामानिमित्ताने गावांत येत असतील त्यांची टू.व्हिलर अडवुन त्यांना कागद पत्र दाखवा,मास्क नाही असे अनेक कारणे सांगुण दंडात्मक कार्यवाही करतांना दिसून येतात.नाहीतर नेमप्लेटचा फोटो काढून त्यांना लोकन्यायालयात येण्याची ऑनलाईन नोटीस पाठवत असतात.हा मनस्ताप प्रामाणिक माणसांना होतांना दिसून येत आहे.गोपाल टी समोर बाहेर रस्त्यांवर चालायला जागा नाही.युपी.बिहार,राजस्थान मधील काही ब्लॅंकेट,चादरी,पडदे विक्री करणारे वाहतूकीस अडथळा ठरत आहेत.त्यांच्या कडे दुर्लक्ष केले जाते.म्हणून कायदा सुव्यवस्था वाहतूक शाखेकडून नेमकी कुणासाठी आहे? म्हणून धुळ्याच्या वाहतूक शाखेस वाली नेमका कोण? अधिकारी आहेत की नाही? आपल्या वाहतूक शाखेकडे धुळे जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी लक्ष घातले तर सामान्य नागरीकांना ट्राफिक पासून दिलासा मिळेल.

पोलीस व्हिजन पंचनामा


# "स्त्रीभ्रृणहत्या" थांबवण्यासाठी सरकारकडून प्रयत्न चाललेले पुरेसे आहेत!

(पान..०३ वरून..)

बळी घेणे म्हणजे स्त्रीभ्रृणहत्या हे एक पाप आहे. 'गर्भनिदान' कायद्याने गुन्हा ठरविला आहे.या कायद्यान्वये गर्भातिल लिंग तपासणी करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याला दंड आणि शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.मुलींच्या जन्मदरात घट ही एक चिंताजनक बाब आहे.त्यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या परिस्थितीची जाणिव करणे गरजेचे ठरत आहे.स्त्रीवीणा जगाची कल्पना कोणीही करू शकत नाही. तरी तीच्या जन्मा नंतर दुःखाची छाया पसरते म्हणूनच समाजात मुलींविषयी प्रबोधन करण्याची गरज आहे.

मुलगा हा म्हातारपनाची काठी समजला जातो. पण आज आपल्या देशात समाजात पाहिले तर मुलगा खरोखरच म्हातारपणाची काठी आहे का? मुली त्यांच्या आई-वडीलांची म्हातारपणाची काठी होऊ शकत नाही का? आता काळ बदलला आहे.आज अनेक कुटुंबात मुली आपल्या पालकांची काळजी घेतांना दिसतात.कुटुंबात स्त्री घराचा आधार आहे.आजची स्त्री ही सबळ आहे.सक्षम आहे.महिला ही शक्ती आहे. म्हणूनच समाजाची मानसिकता बदलण्याकरीता जनजागृती करणे आवश्यक आहे.

जर स्त्री होणे हा गुन्हा आहे तर तीच्या पोटी जन्म घेतलेला प्रत्येक पुरूष हा त्या गुन्ह्याचा भागीदार आहे.का म्हणून आपण जागतिक महिला दिन साजरा करत आहोत.'स्त्री जन्म म्हणून न व्हावे उदास' असा संदेश संत जनाबाई यांनी स्त्री वाचवा या दृष्टीने समाजाला दिला .स्त्री भ्रृणहत्येच्या संदर्भात कायदा अपूर्ण पडत असुन समाजाची मानसीकता बदलण्याची गरज आहे.त्या करीता मुलगा असो किंवा मुलगी आनंदच व्हायला हवा.'मुलगी झाली प्रगती झाली' अशा घोषवाक्यांची गरज आहे.जसा समाजात वाईट गोष्टींचा परीणाम होतो.तसा चांगल्याही गोष्टींचा निच्छितच परीणाम होतो.फक्त वेळ लागतो....



यश साळुंके

RNI.NO.MAHMAR/2010/32153
पोलीस व्हिजन
साप्ताहिक पोलीस व्हिजन आता आपल्या स्वतंत्र वेबसाईटवर पदार्पण करत आहे.खास आमच्या वाचकांसाठी
Website Domain-http://policevision.co.in/
मुख्य संपादक-श्री.प्रल्हाद गोविंदराव साळुंके संपर्क- ९८८१४०४३६१
E-mail:-policevision@gmail.com
कार्यकारी संपादिका - सौ.प्रतिभा प्रल्हाद साळुंके संपर्क- ८६६९०७२७०१
RNI.NO.MAHMAR/2010/32153
प्रकाशन स्थळ- श्रध्दा,७२ स्वामी नारायण सोसायटी मार्केट यार्ड,धुळे-महाराष्ट्र राज्य-४२४००१
सा.पोलीस व्हिजन वर ऑनलाईन पोर्टल पेपर आपली जाहिरात प्रसिध्द करायची आहे तर मग संपर्क करा.
संपादक-९८८१४०४३६१
संपर्क- मुख्य संपादक सा.पोलीस व्हिजन,धुळे- ९८८१४०४३६१ Email.policevision@gmail.com